“Yoga does not mean duality. Yoga means unity. Duality is a kind of hallucination and in order to correct this mistake, the practice of yoga should be done. In the practice of yoga the lower consciousness, which operates through the body, the senses, the mind, the intelligence, the ego, is negated through the process of meditation, which develops and illumines the inner part of your personality.”

………………………………

There is a subterranean relationship between our inner contents and the whole cosmos outside. The moment we begin to enter the realm of yoga practice; we also start operating upon our cosmic relationships.

It is easier to receive the grace of God than anything from the marketplace. If you want to get something from the shop, you must walk some distance. But to reach God, you do not have to travel any distance.

SWAMI KRISHNANANDA



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत–

- डिसेंबर २०२५ चा सत्संग २८ रोजी संपन्न झाला. ‘दिव्य जीवन’ या आपल्या मासिक पत्रिकेचा
- ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्याचा अंक परिवारातील सदस्यांना (हार्ड आणि सॉफ्ट स्वरूपात) पाठविण्यात आला.

### पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे

‘ईशावास्य’ प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्व,

धायरी, पुणे ४११०६८, मो.नं.९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति,



# दिव्य जीवन




पुणे शाखा

वर्ष २१ /अंक १२

डिसेंबर

२०२५



Prime Minister of India Sri Modi Ji just issued “Prime Minister's Award for outstanding Contribution towards the Development and Promotion of Yoga “ — to The Divine Life Society International Headquarters, Rishikesh. On behalf of Sivananda Ashram, Rishikesh, Rev Swami Yogaswarupananda Ji Maharaj received the award.

All glory to Gurudev H H Sri Swami Sivananda Saraswati Ji Maharaj.

## महिन्याचा विचार :

ज्या वेगाने एक विचार मनात उसळी मारून येत असेल तितक्याच सहजतेने गुरुदेव दुसऱ्या विचाराला दडपून टाकू शकत आणि मन निरभ्र करू शकत. काहीही स्मरणात राहण्यासाठी त्यांना मनाशी कुस्ती खेळावी लागत नसे. प्रत्यक्षात आपण जी कुस्ती खेळतो, त्याचा नेमका उलटा परिणाम होतो आणि स्मृती अधिक बिकट होत जातात. मात्र गुरुदेव मनाला स्थिर करीत, त्यांत खोलवर विहार करीत आणि त्यांना हवे असलेले पृष्ठभागावर घेऊन येत. विश्वातील ते एक असे व्यक्तिमत्व होते, ज्यांना कधीच ' मला काहीतरी सांगायचे होते पण आता मी ते विसरलोय. ' असं म्हणण्याची गरज भासली नाही. जगाला सांगण्यासारख्या असंख्य घटना त्यांच्याकडे होत्या, कार्यालयीन कर्मचाऱ्यांना समजावून सांगण्यासारख्या अनेक व्यवस्थापकीय सूचना होत्या. तसेच एखाद्या आश्रमवासियाने जर अभ्यागताने आणलेल्या प्रसादातून काही फळे काढून ठेवली असली तर तेही गुरुदेवांच्या मेंदूत साठवून ठेवलेले असे. विश्रांतीसाठी जाण्यापूर्वी गुरुदेव असं सगळं लक्षात ठेवीत असत, आणि जेव्हा जेव्हा विविध मंडळींना ते भेटत तेव्हा त्यांना देण्यासाठी गुरुदेवांकडे सूचना तयार असत. हजरजबाबीपण हा गुरुदेवांचा एक अंगीभूत गुणविशेष होता. ध्यानधारणेने त्यांच्या आनंदी चेहेऱ्यावर आभा येत असे, डोळ्यांमध्ये तारुण्याची झलक येत असे आणि व्यक्तिमत्वात वास्तव्यास आलेल्या शांततेचे आणि परमानंदाचे ते तेजोवलय होते. त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या माणसांचे हृदय हलके होत असे, समाधानी होत असे आणि त्यांना मनःशांती मिळत असे. शंका-कुशंका, तक्रारी घेऊन त्यांना भेटणारी माणसे शांत होत आणि गुरुदेवांच्या दर्शनाने शत्रुभावना दूर होत असे. गुरुदेवांच्या काही शिष्यांच्या नजरेस हे तेजोवलय प्रत्यक्षात पडलेलं आहे. विजयादशमीच्या रात्री नागपूरच्या प्रो. सबारत्नम यांना गुरुदेवांचा चेहेरा पौर्णिमेच्या चंद्रासारखा तेजःपुंज भासला आणि त्यासाठी गुरुदेवांची ध्यानधारणा कारणीभूत आहे, असं त्यांना वाटलं. विशेषकरून देवीच्या नऊ दिवसांच्या नवरात्रीतील ध्यान. मुंगेरच्या प्रवासादरम्यान एका सकाळी सुरु असलेल्या ध्यानशिबीरात गुरुदेवांच्या शरीराभोवती शिष्यांना दैवी, अलौकिक प्रभा जाणवली.

असाच परिणाम गुरुदेवांच्या मनावरही झालेला होता. क्षणभरासाठी कां होईना त्यांचे मन स्वतःमध्ये वळण्यासाठी उत्सुक असे. विशेषतः भक्तिसंगीत गायनाच्या वेळी त्यांच्या चेहेऱ्यावर अशी दिव्य प्रभा नजरेस पडत असे. अर्धोन्मीलित नेत्रांमधील आनंद त्यांच्या चेहेऱ्यावर झळकत असे. भैरव, नृसिंह, सूर्यदेवता अशांचे ध्यानातील स्मरण गुरुदेवांना अदभूत सामर्थ्य प्रदान करीत असे. असं कधीतरी आपोआप दृगोच्चर होत असे.

जेव्हा ते आपल्याशी संवाद साधत असतात, तेव्हा त्यांच्यात प्रेमळ आईचे दर्शन होते, अनुकंपा आणि मायेने भरलेल्या. व्याख्यान देताना त्यांचे सिंहगर्जनेसारखे बोल ऐकण्यासारखे असतात. त्यांच्या चेहेऱ्यावर एक करारी छटा असते आणि उत्तेजना देण्यासाठी रोखलेले बोट असते- जणू ते दाखवीत असतात, जगाचा नाद सोडा आणि ध्यानधारणेकडे लक्ष केंद्रित करा. संन्यास दीक्षा देताना त्यांच्या देहातून जणू ज्ञानाचा अंगार बाहेर पडतोय असं वाटतं. त्यांचे रूप कायम झळाळीयुक्त असायचे आणि त्यांच्याकडे दैवी अस्तित्वाकडे नजर जरी टाकली तरी अचंबित होण्यावाचून पर्याय नसायचा. स्वतःच्या अध्यात्मिक रूपाबाबत ते स्वतःमात्र अनभिज्ञ असत.

महत्वाचे म्हणजे त्यांच्यामधून प्रकट होणारे शांततेचे विलोभनीय रूप. त्यांच्या गंगाकिनारी बसण्याच्या स्थानावरून ते जगावर कृपादृष्टींचा आणि शांततेचा वर्षाव करीत असत. लक्षावधी मुमुक्षू आत्म्यांपर्यंत या लहरी पोहोचत असत आणि गुरुदेवांचे विचारप्रवाह ते ग्रहण करत. स्वतःमधील ज्ञानज्योत मग आपोआप इतरांमध्ये संक्रमित होत असे. दिव्य जीवनाचे सार- मनःशांती, प्रेम आणि सेवा त्यांनी आपल्या ३०० हुन अधिक पुस्तकांमध्ये प्रसारित केले आणि अध्यात्मिक परिघातील हृदयपरिवर्तन ही मानवतेला दिलेली सर्वोच्च देणगी गुरुदेवांनी बहाल केली. (क्रमशः )